प्रेसनोट दि. २४/१०/२०१७

## दोन फिल्मचा आर्ट डायरेक्टर व स्वतःला फिल्मचा प्रसिध्द प्रॉडयूसर व डायरेक्टर सांगुन महाराष्ट्र व गोवा मध्ये अनेक फोटोग्राफर व मॉडेल यांना गोड बोलून सहजपणे फसविणाऱ्या सराईत गुन्हेगारास युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरच्या टिमने शिताफीने केली अटक

आज रोजी स्वतःला फिल्मचा प्रसिध्द प्रोडयूसर व डायरेक्टर सांगुन महाराष्ट्र व गोवा मध्ये अनेक फोटोग्राफर व मॉडेल यांना गोड बोलून सहजपणे हातोहात फसविणारा सराईत गुन्हेगार संदीप महादेव व्हरांबळे ऊर्फ सॅन्डी पाटील, रा मु पो साबळे गल्ली, हळदी, ता कागल, जिल्हा कोल्हापुर यास वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन भोसले पाटील, गुन्हे शाखा, युनिट १, यांना प्राप्त झालेले बातमीचे अनुशंगाने गुन्हे शाखा, युनिट १ पुणे शहरच्या पथकाने, चित्रपट महामंडळाच्या कार्यकर्त्यांचे मदतीने शिताफीने अटक केली आहे.

सदर आरोपी हा फोटोग्राफर लोकांचे जस्ट डायल वरुन फोन नंबर घेवून व फेसबुक तसेच इतर सोशल नेटवर्कींगच्या माध्यमातून फोटोग्राफर व ज्यांना मॉडेल होण्यास तयार असतात अश्या तरूणी संदर्भात माहिती घेवून, त्यांचेशी संपर्क करून, महीलांचे मॉडेल फोटोशुट करून हवे आहेत अशी बतावणी फोटाग्राफर यांना करून, त्यासाठी तुंम्ही किती रक्कम घेता, असे विचारून फोटोशुट करून ज्यांना मॉडेल म्हणुन काम करण्याची इच्छा असते, त्यांना फिल्म मध्ये जाहिरातीमध्ये काम देतो असे अमिष दाखवून त्यांचे कडून पैसे घेवून महिलांची व फोटोग्राफर यांची फसणवूक करून, पसार होत असतो. नंतर पून्हा संपर्क न करता लोकांचे फोटो न घेता फसवणूक करण्याचे काम सराईतपणे करतो. अशाच प्रकारे पुणे येथील फोटो ग्राफर श्री उत्कर्ष प्रमोद केळकर, रा. डि एस के विश्व, धायरी, पुणे यांची अशाच प्रकारे सन २०१५ मध्ये व ऑक्टोबर २०१७ मध्ये फसवणूक केली आहे.

तसेच संदीप महादेव व्हरांबळे ऊर्फ सॅन्डी पाटील याने मुंबई, नवि मुंबई, ठाणे, औरंगाबाद, अमरावती, नाशिक, गोवा अश्या शहरामधिल फोटो ग्राफर व मॉडेल म्हणुन काम करणारे तरूणींची अशाच प्रकारे फसवणूक केलेच निष्पन्न झाले आहेत. सदर इसमाचे पत्नीने सन २०१३ मध्ये घटस्फोटाची केस दाखल केली होती. तीचा निर्णय सन २०१६ मध्ये लागला असून, तो मॉडेल फोटोशुटच्या कामाच्या निमीत्ताने विवीध महिलांची जवळीक करून त्यांना गंडा घालीत असतो. सदर इसमा विरुध्द , वाशी, नवि मुंबई, रत्नागिरी, पणजी पोलीस स्टेशन, गोवा येथे गुन्हे दाखल आहेत. सदर इसम हा सन २०१४ पासून पोलीसांना गुंगारा देत होता, त्यास शिताफीने अटक करण्यात आली आहे. अश्या प्रकारची ज्यांची फसवणुक झाली आहे, त्यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, युनिट १, पुणे शहर यांचे बरोबर संपर्क साधावा असे अवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुधीर हिरेमठ, सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले सो., सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.हवा. रिजवान जिनेडी, इरफान मोमीन, मोहन येलपले, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, सचिन जाधव, इम्रान शेख, विजयसिंग वसावे, राजू पवार, प्रकाश लोखंडे, अशोक माने, सुभाष पिंगळे, मेहबुब मोकाशी, उमेश काटे, प्रशांत गायकवाड, गजानन सोनुने, यांनी केली आहे.

